# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः15.01.2025** **वारःबुधवार**

---

1. भारतीय हवामान विभाग देशाच्या वैज्ञानिक प्रगतीचं प्रतिक असल्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे गौरवोद्गार
2. पंतप्रधानांच्या उपस्थितीत आज मुंबईत नौदलाच्या ताफ्यात 2 युद्धनौका आणि 1 पाणबुडी समाविष्ट होणार
3. 77 व्या लष्कर दिनाचं संचलन आज पुण्यात; संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांच्या उपस्थितीत गौरव गाथा कार्यक्रमाचंही आयोजन
4. पानिपत शौर्य स्मारकाच्या विकासासाठी राज्य सरकार सर्वोतोपरी सहकार्य करेल-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची ग्वाही आणि
5. खोखो विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला आणि पुरुष संघांची आगेकूच

**पंतप्रधान**

भारतीय हवामान विभाग हा देशाच्या वैज्ञानिक प्रगतीचं प्रतिक आहे, असे गौरवोद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल काढले. भारतीय हवामान विभागाच्या दीडशेव्या स्थापना दिनानिमित्त नवी दिल्लीत भारत मंडपम इथं आयोजित सोहळ्यात ते बोलत होते. हवामानाचा वेध घेण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रणाली, रडार आणि उपग्रह तसंच उच्च दर्जाच्या संगणक प्रणालीचा समावेश असलेल्या मिशन मौसम या उपक्रमाचं उद्घाटन पंतप्रधानांच्या हस्ते झालं. मिशन मौसम या उपक्रमातून शाश्वत आणि भविष्यवेधी भारत घडवण्याचा संकल्प अधोरेखित होत असल्याचं मोदी यावेळी म्हणाले. हवामानशास्त्र विभागाच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त एका विशेष नाण्याचं अनावरणही त्यांनी केलं.

**पंतप्रधान मोदी-मुंबई**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज मुंबईच्या दौऱ्यावर येत आहेत, त्यांच्या उपस्थितीत आज मुंबईत आयएनएस सुरत, आयएनएस निलगिरी या दोन युद्धनौका, आणि आयएनएस वाघशीर ही पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार आहे. पहिल्यांदाच एकापेक्षा अधिक युद्धनौका आणि पाणबुडी एकाचवेळी नौदलाच्या ताफ्यात सहभागी होणार आहेत. नौदलाच्या माझगाव गोदीमध्ये या युद्धनौका आणि पाणबुडीची बांधणी करण्यात आली आहे. आपल्या मुंबई दौऱ्यात पंतप्रधान नवी मुंबईतील इस्कॉनच्या श्रीश्री राधा मदनमोहनजी मंदिराचं उद्घाटनही करणार आहेत.

**लष्कर दिन**

77व्या लष्कर दिनाचं मुख्य संचलन आज पुण्यात बॉम्बे इंजिनिअरिंग ग्रुपच्या मैदानावर होत आहे. या संचलन सोहळ्याला लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी उपस्थित राहणार आहेत. लष्कर दिनानिमित्त संध्याकाळी होणाऱ्या गौरव गाथा या कार्यक्रमाला संरक्षण मंत्री राजनाथ सिंग यांची प्रमुख उपस्थिती असेल. लष्कर दिनानिमित्त होणारं संचलन पहिल्यांदाच पुण्यात होत असून यामध्ये लष्कर, पोलीस दल आणि महाराष्ट्र एनसीसीचं महिला पथक सहभागी होणार आहे. प्रथमच नेपाळचा लष्करी वाद्यवृंदही या कार्यक्रमात सहभागी होणार आहे.

**लष्कर प्रमुख**

सैन्य दलांतील माजी सैनिक आणि त्यांच्या परिवाराचा देशाला अभिमान असून ते देशासाठी प्रेरणास्रोत आहेत, असं प्रतिपादन लष्कर प्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी यांनी काल पुण्यात केलं. नवव्या सशस्त्र माजी सैनिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. 28 हजार माजी सैनिकांना रोजगार मिळावा यासाठी कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात आलं आल्याचं जनरल द्विवेदी म्हणाले. यावेळी वीर पत्नी, आणि वीर सैनिकांच्या पालकांचा द्विवेदी यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. तसंच सन्मान या नियतकालिकाचं प्रकाशनही करण्यात आलं.

**सैनिक-गडकरी**

संरक्षण दलात सैनिकांनी केलेलं सेवाकार्य आपण कधीच विसरू शकत नाही; त्यांच्यामुळेच या देशाचा गौरवशाली इतिहास, परंपरा आणि आपणही सुरक्षित असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी केलं आहे. ते काल नागपूर इथं सशस्त्र सेना निवृत्त कर्मचारी दिवसानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते.

**पानीपत**

मराठयांनी राष्ट्र संरक्षणासाठी पानिपतच्या युध्दात जीवाची बाजी लावून लढा दिला; या युद्धाच्या शौर्य स्मारकासाठी राज्य शासन सर्वोतोपरी सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पानिपत इथं दिली. पानिपत युध्दाला 264 वर्ष पूर्ण झाली; यानिमित्ताने पानिपत इथल्या काला आम परिसरात मराठा शौर्य दिनाचं आयोजन करण्यात आलं होतं; त्यावेळी ते बोलत होते. या युद्धात हुतात्मा झालेल्या शूरवीरांना मुख्यमंत्र्यांनी अभिवादन केलं. पानिपत शौर्य समितीच्यावतीने गेल्या 19 वर्षांपासून या कार्यक्रमाचं आयोजन केलं जातं. यावेळी माध्यमांशी बोलताना मुख्यमंत्री म्हणाले...

**आनंदवन**

चंद्रपूर जिल्ह्याच्या वरोरा इथल्या आनंदवन महारोगी सेवा समिती संस्थेला कुष्ठरुग्णांचे उपचार आणि पुनर्वसनासाठी 1 कोटी 86 लाख रुपये तर, आनंद अंध, मुकबधीर आणि संधीनिकेतन दिव्यांग

कार्यशाळेसाठी 1 कोटी 22 लाख रुपये असा एकंदर 3 कोटी 8 लाख रुपयांचा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत. थोर समाजसेवक दिवंगत बाबा आमटे आणि साधनाताई आमटे यांनी 75 वर्षांपूर्वी स्थापन केलेली महारोगी सेवा संस्था आर्थिक अडचणीत असल्याची बाब संस्थेचे सचिव डॉ. विकास आमटे यांनी अजित पवार यांच्या लक्षात आणून दिली होती; त्यानंतर हा निधी तातडीने वितरीत करण्याचे निर्देश पवार यांनी प्रशासनाला दिले.

**संक्रांत-नाशिक, अहिल्यानगर, कोल्हापूर**

राज्यात काल सर्वत्र मकरसंक्रांतीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. नाशिक मधल्या रामकुंडावर भाविकांनी स्नानासाठी गर्दी केली होती. सर्वत्र तिळगुळ वाटपाचा उत्साह होता. या निमित्ताने राज्यात मंदिरांमध्ये भाविकांची गर्दी दिसून आली कोल्हापुरात करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीची हलव्याच्या दागिन्यांनी आकर्षक पूजा बांधण्यात आली होती.

**छत्रपती संभाजीनगर**

दहाव्या अजिंठा वेरूळ आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचं उद्घाटन आज संध्याकाळी छत्रपती संभाजी नगर इथं होणार आहे. केंद्रीय माहिती प्रसारण मंत्रालयाचे सचिव संजय जाजू आणि मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे या उद्घाटन सोहळ्याला प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. यंदाचा पद्मपाणि जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ लेखिका, निर्मात्या दिग्दर्शिका सई परांजपे यांना संजय जाजू यांच्या हस्ते प्रदान करण्यात येईल.

**मिलेट**

महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळामार्फत 8 ते 12 जानेवारी या कालावधीत पुण्यात आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या तृणधान्य महोत्सवाला चांगला प्रतिसाद मिळाला. या महोत्सवामध्ये 35 लाख रुपयांची उलाढाल झाल्याची माहिती मंडळाचे कार्यकारी संचालक संजय कदम यांनी दिली आहे.

**बीड हत्या**

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोग इथले सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी वाल्मिक कराड याच्यावर मकोका दाखल करण्यात आला आहे. तसंच कराड याचा ताबा एसआयटीकडे देण्याचा निर्णय न्यायालयने घेतला आहे. दरम्यान कराड याला बीड इथं आणलं असता त्याची तब्येत बिघडल्याने त्याला तत्काळ जिल्हा रुग्णालयामध्ये दाखल करण्यात आलं आहे.

**मांजा मृत्यू-नाशिक**

नाशिकमध्ये संक्रांतीच्या निमित्ताने पतंगोत्सव साजरा केला जात असतानाच नॉयलॉन मांजामुळे गळा कापला गेल्याने एका युवकाचा बळी गेला आहे. दरम्यान घातक मांजाच्या वापरावर बंदी घालण्यात

आली असून पोलीस आणि प्रशासनानं राज्यात अनेक ठिकाणी कारवाई करुन नायलॉन मांजाचे साठे जप्त केले आहेत.

**निधन**

संगीत रंगभूमीचे अभ्यासक, गायक, संगीतकार अरविंद पिळगांवकर यांचं नुकतंच मुंबईत अल्पशा आजाराने निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. त्यांनी अनेक नाटकांमधून विविध भूमिका साकारल्या. तसंच आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या कार्यक्रमांसाठी देखील काम केलं.

**खोखो**

खो खो विश्वचषक स्पर्धेत भारताच्या दोन्ही संघांनी काल चमकदार कामगिरी करत विजयाची नोंद केली. प्रियांका इंगळे हिच्या नेतृत्वातील भारतीय महिला संघानं काल सलामीच्या सामन्यात दक्षिण कोरियावर 175-18 असा दणदणीत विजय मिळवला. तर भारतीय पुरुष संघानंही ब्राझीलवर 64-34 अशा गुणांनी मात केली.

**कबड्डी**

23व्या छत्रपती शिवाजी महाराज चषक राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचं बारामती इथं आयोजन करण्यात आलं आहे. आजपासून 19 जानेवारीपर्यंत होणाऱ्या या स्पर्धेचं उद्घाटन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते तर पारितोषिक वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. ऑलिम्पिकपटू दिवंगत खाशाबा जाधव यांचा जन्मदिन 'राज्य क्रीडा दिन' म्हणून साजरा करण्यात येतो. याचं औचित्य साधून क्रीडा आणि युवक सेवा संचालनालय आणि महाराष्ट्र राज्य कबड्डी संघटनेनं या स्पर्धेचं आयोजन केलं आहे.

**हवामान**

मध्य महाराष्ट्रात आज तुरळक ठिकाणी हलक्या पावसाची शक्यता आहे. कोकण, आणि मराठवाड्यात अंशतः ढगाळ हवामान राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.